




दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ४८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०१ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# या जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता, हवामान विभागाचा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** यंदा १ जून ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्यातील १९ जिल्ह्यांत सरासरीच्या केवळ ५० ते ७५ टक्के पाऊस झाल्याचे कृषी विभागाच्या आढाव्यातून समोर आले आहे. नंदुरबार, सोलापूर, लातूर, कोल्हापूर, अमरावती, परभणी, अकोला, बीड आणि धाराशिवसह अनेक जिल्ह्यांत पर्जन्यमानात मोठी तूट नोंदली गेली आहे. खरीप हंगामातील या असमान आणि दीर्घ उघडीप घेतलेल्या पावसामुळे राज्यातील शेतीउत्पन्न घटण्याची भीती व्यक्त होत आहे.

**हवामान विभागाचा अंदाज !**

काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ४०-६० किमी वेगाने वाहणारे सोसाट्याचे वारे पडण्याची दाट शक्यता आहे. तर सांगली जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट सांगितला आहे. तसेच कोल्हापूर, सातारा पुणे आणि सोलापूर या जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

**कृषी विभागाचा सविस्तर अहवाल**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत कृषी विभागाने याबाबत सविस्तर अहवाल सादर केला. यानुसार पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक भागांत सोयाबीन, मूग, उडीद, कापूस, तूर, मका आणि ज्वारीच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. नंदुरबारमध्ये सरासरीच्या ५०.४ टक्के, सोलापूरमध्ये ५१.६ टक्के, कोल्हापुरात ५१.७ टक्के, तर लातूरमध्ये ५२.५ टक्के पाऊस झाला. अमरावतीत ५७.१ टक्के, परभणीत ५८.१ टक्के, अकोल्यात ६२ टक्के, वाशिममध्ये ६२.५ टक्के, धाराशिवमध्ये ६२.७ टक्के आणि बीडमध्ये ६३ टक्के पर्जन्यमान नोंदले गेले.

**पिकांची स्थिती असमाधानकारक**

मराठवाड्यातील परिस्थिती विशेषतः चिंताजनक असल्याचे पीक पाहणी



अहवालातून स्पष्ट होते. परभणी जिल्ह्यातील सर्व नऊ तालुक्यांत पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिकांची स्थिती असमाधानकारक आहे. सोयाबीन, ज्वारी, मूग आणि उडिदाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यांत पिकांची स्थिती असमाधानकारक आहे. धुळे जिल्ह्यात मध्यम आणि हलक्या जमिनीवरील खरीप पिके अतिसंवेदनशील अवस्थेत आहेत. विदर्भातही अनेक जिल्ह्यांत पर्जन्यमानात तूट आहे. अमरावतीत सरासरीच्या केवळ ५७.१ टक्के, अकोल्यात ६२ टक्के, वाशिममध्ये ६२.५ टक्के, नागपुरात ६३.७ टक्के, वर्ध्यात ६५ टक्के आणि चंद्रपुरात ६५.७ टक्के पाऊस झाला आहे. यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांत पर्जन्यमान तुलनेने अधिक आहे.

**कोणत्या जिल्ह्यात किती पाऊस?**

सिंधुदुर्ग, अहिल्यानगर, नाशिक, नंदुरबार, सोलापूर, कोल्हापूर, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर हे १९ जिल्हे सरासरीच्या ५० ते ७५ टक्के पर्जन्यमानाच्या गटात आहेत. याउलट १३ जिल्ह्यांत ७५ ते १०० टक्के, तर ठाणे आणि पालघर या दोन जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. राज्यात १३७.२८ लाख हेक्टरवर खरीप पेरणी झाली असून, हे सरासरी क्षेत्राच्या ९५ टक्के आहे. पुढील काळातील पावसाचे प्रमाण आणि वितरण निर्णायक ठरणार आहे.

## २२ वर्षीय तरुणाची विष प्राशन करून आत्महत्या; उपचारादरम्यान मृत्यू



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील करंजी येथील २२ वर्षीय तरुणाने राहत्या घरी विष प्राशन केल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ऋषिकेश सुनिल निंबाळकर (वय २२, रा. करंजी, ता. निफाड) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऋषिकेश याने २३ सप्टेंबर रोजी सकाळी राहत्या घरी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले होते. प्रकृती खालावल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यास तातडीने उपचारासाठी वडांगळी येथील मातोश्री हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यास पुढील उपचारासाठी सिन्नर येथील चैतन्य हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यास मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मृत ऋषिकेश याचा चुलत भाऊ रमेश काळू निंबाळकर यांनी पोलिसांना दिली. सुरुवातीला याप्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर तपासाची सर्व कागदपत्रे सायखेडा पोलिसांकडे वर्ग करण्यात आली. सायखेडा पोलीस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी अकस्मात मृत्यू रजि. क्र. ४३/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास सायखेडा पोलीस करत आहेत.

## अवैध धंदे त्वरित बंद करा; अन्यथा स्टेशन समोर उपोषणाचा इशारा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, लोणार (बुलडाणा) :** लोणार शहर तसेच तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये फोफावलेली गुटख्याची खुलेआम विक्री, वरली-मटका जुगार आणि अवैध देशी-विदेशी दारूची विक्री त्वरित बंद करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी; अन्यथा येत्या १५ ऑक्टोबर २०२६ पासून लोणार पोलीस ठाण्यासमोर प्राणांतिक आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा खणखणीत इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बच्छीरे, शहर प्रमुख गजानन जाधव यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना तक्रारीद्वारे इशारा दिला आहे. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, लोणार शहर व परिसरातील ग्रामीण भागात सध्याच्या घडीला प्रतिबंधित गुटखा, वरली मटका आणि अवैध दारूची विक्री सर्रासपणे सुरू आहे. एकीकडे लोणार तालुका आधीच तीव्र दुष्काळाच्या संकटात होरपळत असताना, दुसरीकडे सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर आणि तरुण पिढी या व्यसनाधीनतेच्या तसेच जुगाराच्या विळख्यात सापडली आहे. या अवैध धंद्यांमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असून, अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत.

तालुक्यातील सामाजिक वातावरण आणि कुटुंबे वाचवण्यासाठी हे अवैध धंदे मुळासकट मोडून काढणे अत्यंत गरजेचे झाले आहे. प्रशासनाने येत्या आठ दिवसांच्या आत यावर धडक कारवाई करून अवैध धंदे पूर्णपणे बंद पाडावेत, अशी ठाम मागणी डॉ. बच्छीरे यांनी केली आहे. आठ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास १५ ऑक्टोबर २०२६ पासून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे लोणार पोलीस ठाण्यासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.या निवेदनाच्या प्रती राज्याचे गृहमंत्री, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी, मेहकर-लोणार विधानसभा क्षेत्राचे आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी (मेहकर-लोणार) तसेच लोणार तहसीलदार यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. या आक्रमक भूमिकेमुळे तालुक्यातील अवैध धंदे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले असून पोलीस प्रशासन यावर काय पावले उचलते याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# चंद्रपूर पोलीस दलात फेरबदल; २३ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा पोलिस दलातील पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून सोमवारी २८ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आले. विनंतीवरून तसेच प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांमध्येही बदल झाला आहे. विनंतीवरून करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये पोलीस निरीक्षक विनोद रहांगडाले यांची नियंत्रण कक्ष, चंद्रपूर येथून कोरपना पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक लता वाडीवे यांची कोरपना येथून सिंदेवाही येथे, तर पोलीस निरीक्षक निशीकांत रामटेके यांची चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यातून जिल्हा विशेष शाखा प्रभारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले



यांची ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यातून गडचांदूर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश हत्तीगोटे यांची गोंडपिंपरी येथून मुल पोलीस ठाण्यात, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप पोटभरे यांची नागभीड येथून भिसी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी बदली झाली आहे.

पोलीस निरीक्षक कांचन पांडे यांची सिंदेवाही येथून ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक योगिता चाफले यांची जिल्हा विशेष शाखेतून आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र सोनवणे यांची नियंत्रण कक्षातून सायबर पोलीस ठाण्यात, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहीफळे यांची नियंत्रण कक्षातून वरोरा पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत लभाने यांची रामनगर पोलीस ठाण्यातून उपपोलीस ठाणे लाठी येथे बदली करण्यात आली आहे. दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सहारे, मनोज खडसे, रमेश नन्नावरे व अनिल राऊत तसेच पोलीस उपनिरीक्षक रविंद्र इंगळे, भारत थिटे आणि अशोक मरस्कोल्हे यांच्या विनंती बदल्या अमान्य करण्यात आल्या आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद भस्मे यांची वरोरा पोलीस ठाण्यातून रामनगर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विरेंद्र केदार यांची भद्रावती येथून उपपोलीस ठाणे धाबा येथे प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेंद्रसिंग यादव यांची शेंगाव येथून भद्रावती पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश खरसान यांची कोठारी पोलीस ठाण्यातून आर्थिक गुन्हे शाखा, चंद्रपूर येथे बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक कांक्रेडवार यांची स्थानिक गुन्हे शाखेतून कोठारी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# एसआयआर : दावे-हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) २०२६ अंतर्गत कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झाली आहे. नागरिकांनी या यादीत आपले नाव तपासावे. नाव नसल्यास पात्र नागरिकांनी विहित प्रक्रिया पूर्ण करून मतदार यादीत नाव समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

प्रारूप यादीत नाव नसणे म्हणजे पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहणार असा अर्थ नाही. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासाठी दावे व हरकती दाखल करण्याची मुदत दि. १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविली असून प्राप्त दावे, हरकती व नोटिसांवरील कार्यवाही दि. १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी बी.एल.ओ. (SIR) घरोघरी जाऊन पात्र मतदारांची पडताळणी करणार आहेत.

**नाव कुठे तपासावे?**

नागरिकांनी electoralsearch.eci.gov.in, voters.eci.gov.in किंवा ECINET APP वर जन्मतारीख, ईपीक क्रमांक किंवा मोबाईल क्रमांकाद्वारे नाव तपासावे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या ceo.maharashtra.gov.in संकेतस्थळावर तसेच संबंधित जिल्ह्यांच्या संकेतस्थळांवरही मतदार यादी उपलब्ध आहे. बीएलओ, मतदार नोंदणी अधिकारी (ERO), सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांच्या कार्यालयातून किंवा १९५० या टोल फ्री क्रमांकावर माहिती घेता येईल.

**नाव नसल्यास नमुना ६**

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक ६, स्वतंत्र घोषणापत्र (Declaration) व आवश्यक कागदपत्रांसह voters.eci.gov.in, Voter Helpline App किंवा संबंधित BLO/ERO/AERO कार्यालयामार्फत अर्ज करावा. इतर राज्यातून स्थलांतरित मतदारांनीही हीच प्रक्रिया पूर्ण करावी. यापूर्वीच्या SIR मध्ये स्वतःची किंवा कुटुंबातील सदस्यांची नोंद असल्यास मॅपिंग (Mapping) माहिती द्यावी. ती



उपलब्ध नसल्यास आयोगाने विहित केलेला आवश्यक पुरावा सादर करावा. मात्र संबंधित कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे केवळ त्या कारणावरून अर्ज नाकारला जाणार नाही.

मतदार यादीतील नोंदीत दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८, तर एखाद्या मतदाराच्या नोंदीवर हरकत किंवा नाव वगळण्यासाठी नमुना क्रमांक ७ वापरावा. अर्जाची पोहोचपावती जतन करावी. नवमतदारांनाही नोंदणीची संधी

दि.१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या पात्र युवकांना नमुना क्रमांक ६ भरून मतदार म्हणून नोंदणी करता येईल.

**नोटीसधारक मतदारांसाठी घरपोच सुविधा...**

SIR दरम्यान जुळवणी न झालेले (Unmapped) किंवा तार्किक विसंगती (anamoly) असलेल्या मतदारांना नोटीस मिळाल्यास संबंधित BLO घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रे घेतील व ECINet वर अपलोड करतील. अशा मतदारांना ERO/AERO कार्यालयात सुनावणीसाठी बोलावले जाणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत ERO यांच्या निर्णयानुसार ऑनलाइन सुनावणी होऊ शकते. मतदाराने अधिकृत केल्यास कुटुंबातील प्रौढ सदस्यही त्याच्या वतीने सुनावणीस उपस्थित राहू शकतो.




# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर याच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# मोबाईल नात्यातील 'व्हिलन' बनू लागला आहे का ?

राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार २०२५ मध्ये राज्यभरात २९ हजारहून अधिक घटस्फोटाचे अर्ज दाखल झाले त्यापैकी ३० टक्के प्रकरणांमध्ये घटस्फोटाचे कारण मोबाईल किंवा सोशल मीडिया असल्याचे म्हटले जात आहे. मागील २० वर्षांत भारतात आत्यंतिक वेगाने डिजिटल क्रांती झाली. आजमितीला हातात मोबाईल नाही अशी व्यक्ती क्वचितच पाहायला मिळेल. मोबाईल येण्यापूर्वी अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा होत्या. मोबाईल आल्यानंतर या मूलभूत गरजांमध्ये आता मोबाईलचाही समावेश झाला आहे. मोबाईल आणि त्यामधील इंटरनेट यांमुळे जग जवळ आलं असं म्हटलं जात असलं तरी याच मोबाईलने अनेक समस्यांना आणि संकटांना जन्म दिला आहे हेही तितकेच सत्य आहे.

मोबाईलने ज्ञानाची कवाडे उघडली असली तरी मोबाईलचा वापर ज्ञानार्जनासाठी करणाऱ्यांचे प्रमाण आज किती आहे ? सोशल मीडियामुळे आज दुरावलेले संपर्क पुन्हा जोडले गेले असले तरी नात्यांतील जो ओलावा पत्र पाठवून एकमेकांची खुशाली जाणून घेण्यात होता तो रोजच्या 'गुड मॉर्निंग' आणि 'गुड नाईट' संदेशांमध्ये नक्कीच नाही. सोशल मीडियामुळे ज्यांना आपण कधी पाहिले नाही, ज्यांच्याशी काडीची ओळख नाही ते सुद्धा आपल्या मित्र आणि फॉलोअर्सच्या यादीत जोडले गेले. खेळाची आणि मनोरंजनाची सर्व साधने बाजूला सारून मोबाईलने ते सारे दायित्व आपल्या खांद्यावर घेतले. मोबाईल गेम्सच्या, रिल्स आणि शॉर्ट्सच्या आज आपण इतके आहारी गेलो आहोत कि ज्यावेळी महत्वाचे काही काम नसते त्या वेळेत आपल्यातील बहुतांश जण मोबाईलवर केवळ मनोरंजनातच वेळ घालवत असतात. बस, ट्रेन, रिक्षा, टॅक्सी अशा कोणत्याही साधनाने प्रवास करताना एकदा स्थानापन्न झाल्यावर आधी गवसणी घातली जाते ती खिशातील मोबाईलला. आपले गंतव्य स्थान येईपर्यंत आपण त्या साडेसहा इंचाच्या पेटीत स्वतःला पूर्णपणे झोकून दिलेले असते. आपल्या शेजारी कोण बसले आहे याचे काहीच सोयरसुतक आपल्याला नसते. काही महाभागांनी तर हातात डोळ्यासमोर मोबाईल आणि कानाला इअरबड्स लावून चालताना सुद्धा मनोरंजनात खंड पडू न देण्याचे कौशल्य प्राप्त केलेले दिसून येते.या मनोरंजनाच्या कक्षा कधी आखडू न देण्याचा पुरेपूर बंदोबस्त सोशल मीडियाच्या मालकांनी करून ठेवला आहे.



रिल्स, शॉर्ट्स बनवून त्या व्हायरल झाल्यावर ठराविक व्ह्यूज, शेअर्स आणि कमेंट्स आल्यावर बनवणाऱ्यांना त्याचा आर्थिक मोबदलाही मिळतो त्यामुळे त्यामध्ये करियर करणारे आज लाखो सोशल मीडिया इन्फ्लुएंझर तयार झाले आहेत जे स्वतःच्या तिजोऱ्या भरून आपल्याला मान खाली घालून दिवसातील अधिकाधिक वेळ मोबाईलमध्ये गुंतून राहण्यास भाग पाडतात. घरातील गृहिणींची कथाही याहून वेगळी नाही. सकाळी डब्याला नवीन काय बनवायचे या विचाराने सुरु केलेल्या रेसिपीची रील पाहता पाहता त्या मनोरंजन विश्वात कधी प्रवेश करतात याचे त्यांनाही भान राहत नाही, डब्याची रेसिपी राहते बाजूला रिल्स पाहून मनाला सुखद आनंद देण्यात दीड-दोन तास सहज निघून जातात ऑनलाईन अभ्यासासाठी पालकांचा मोबाईल घेणाऱ्या मुलांची उडी कधी मोबाईल्स मधील गेम्सवर जाते हे पालकांनाही कळत नाही. शाळकरी मुलांना त्या मोबाईलची इतकी सवय होतेकी एका हातात मोबाईल असल्याशिवाय त्यांच्या घशाखाली घासही उतरत नाही. काही ठिकाणी मोठ्यांचेही हाल याहून वेगळे नसतात.

मोबाईलवर ठराविक गेम्स आणि रिल्स सतत पाहिल्यामुळे आपली मनोवृत्ती तशी बनून नवनवीन मानसिक आजार जन्म घेऊ लागले आहेत. संसारात येणाऱ्या लहान सहान अडचणी आणि समस्या यांची उत्तरे जोडीदारासोबत चर्चा करून सोडवण्याऐवजी आपण त्या चॅटजीपीटीची मदत घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करू लागलो आहोत. जीवनातील महत्वाचे निर्णय तथाकथित मोटिवेटर्सच्या मार्गदर्शनाच्या आधारे घेऊ लागलो आहोत. सोशल मीडिया जसा दूरच्या माणसांना जवळ आणू लागला आहे तसा याच सोशल मीडियाचा वापर करून मनाने दुखावलेल्या स्त्रियांना हेरून त्यांना भावनिक आधार देऊन त्यांची फसवणूक करणारे. समस्याग्रस्त पुरुषांचा शोध घेऊन त्यांच्यावर ट्रॅप टाकून त्यांची आर्थिक फसवणूक करणारे सायबर गुन्हेगारही मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहेत अशांना बळी पडणारे अनेकदा जोडीदाराला त्याविषयी कल्पनाही देत नाहीत किंवा त्यांचे सहाय्यही घेत नाहीत. एक काळ असा होता की पती-पत्नीच्या नात्यातील संवादासाठी घरातील बैठक, गॅलरी किंवा एखादा निवांत कोपरा पुरेसा असायचा. दिवसभरातील सुख-दुःख, कामाचा ताण, मुलांच्या समस्या, आर्थिक अडचणी आणि भविष्याचे नियोजन यावर दोघे समोरासमोर बोलायचे. आज परिस्थिती बदलली आहे.

एकाच घरात, कधी कधी एकाच खोलीत बसलेले पती-पत्नी आपापल्या मोबाईलच्या पडद्यामध्ये गुंतलेले दिसतात. शेजारी व्यक्ती असते; पण संवाद मात्र स्क्रीनशी सुरू असतो. जीवनात एक मोबाईल काय आला कि त्याने नात्यांतील संवादच संपवून टाकला. शाळेतून घरी आलेल्या मुलाला आज शाळेत काय गमती जमती घडल्या, काय नवीन शिकायला मिळाले हे कुतूहलाने आई बाबांना सांगण्यात मुळीच रुची नसते पालकांनाही ते जाणून घेण्यात इंटरेस्ट असतो. रात्री जेवताना कुटुंब शरीराने एकत्र असले तरी मन ताटाशेजारी ठेवलेल्या मोबाईलमधील रिल्ससोबत फिरत असते. मोबाईलमुळे पती पत्नींमधील संवाद कमी झाला आहे परिणामी नाते टिकवण्यासाठी लागणारा विश्वास कमी होऊन नात्यातील वीण सैल होऊ लागली आहे. सोशल मीडियाद्वारे मित्र मैत्रिणींसोबतचा वाढलेला संवाद आणि जवळीक संसारात विष पेरू लागली आहे. उशिरापर्यंत एखाद्या व्यक्तीशी चॅट करणे, मेसेज लपवणे, फोनला कठीण पासवर्ड ठेवणे, जोडीदारापासून सोशल मीडिया अकाउंटची माहिती लपवणे, एखाद्या व्यक्तीशी असलेली जवळीक नाकारत राहणे यामुळे पती पत्नीमध्ये दरी निर्माण होऊ लागते. तू ऑनलाइन होतास, मग माझ्या मेसेजला उत्तर का दिले नाहीस? तुझ्या फोनवर कोणाचा मेसेज आला? माझ्यापासून चॅट का लपवलीस? त्या व्यक्तीच्या पोस्टला तू 'लाईक' का केलेस? आज अनेक घरांमध्ये अशा प्रश्नांपासून वादाला सुरुवात होताना दिसते. सोशल मीडिया घराबाहेर बाहेर जरी संवादाचे माध्यम असले तरी पती पत्नीमध्ये ते विश्वास मोजण्याचे साधन बनू लागले आहे. जोडीदाराचे सोशल मीडियावरील स्टेटस, स्टोरी, 'लास्ट सीन', फॉलोअर्स, कमेंट्स, लाईक्स आणि मेसेजेस यावरून नात्यातील विश्वासाचे गणित मांडले जाऊ लागले आहे. स्टेटसवर इतरांनी ठेवलेले यशप्राप्तीचे, आर्थिक प्रगतीचे आणि जोडीदारासोबतच्या सुखद क्षणांचे फोटो आणि व्हिडीओ पाहून मनात ईर्षा निर्माण होऊ लागते किंवा हे सर्व आपल्याला मिळत नसल्याचा न्यूनगंड मनाला पोखरू लागला आहे.

सोशल मीडियामुळे नात्यांतील विश्वास कमी झाल्याने वरच्यावर खटके उडू लागतात, ज्याचे पर्यावसान अनेकदा भांडणात होते. सातत्याने भांडणे होऊ लागल्याने घरातील आणि मनातील शांतता भंग होऊन एकमेकांसोबत राहण्याऐवजी एकमेकांशिवाय राहण्यात अधिक समाधान मिळेल असे वाटून फारकत घेण्याचे विचार बळावू लागतात. मुळात मोबाईल, सोशल मीडिया यांचा योग्य वापर केला तर त्याचे फायदे अमर्याद आहेत; मात्र त्याच्या आहारी गेल्यास हानीही भयंकर आहे त्यामुळे त्याचा कसा आणि कुठे वापर करावा याचे कौशल्य आत्मसात करण्याची आज नितांत गरज आहे. सोशल मीडियावर हजारो फॉलोअर्स असणाऱ्यांवरसुद्धा जेव्हा बिकट प्रसंग ओढवतो तेव्हा कोणीच मदतीला धावत नाही. अशावेळी सर्वात मोठा आधार असतो तो जोडीदाराचा. जोडीदाराशी असलेली जवळीक कठीणातील कठीण प्रसंगाला सामोरे जाण्याचे बळ देते, मोठमोठ्या संकटातून अलगद तारून नेते. सोशल मीडियाचे जग हा केवळ आभास आहे. हे त्याचवेळी उमजते त्यामुळे नात्यामध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी आणि ते बळकट करण्यासाठी आवश्यक तिथे मोबाईलला दूर ठेवणेच योग्य आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## आयुर्दाय

कपोत विष्ठा घातक
विज्ञान सांगते काय
समजून घ्या निवांत
नको आडवे ते पाय

असाध्य व्याधी ग्रासे
पहा केवढे ते अपाय
कबुतरांना वाचवायं
इतर कित्येक उपाय

अन्यत्र हलवावे पक्षी
उघडून विशिष्टसराय
भूतदया दाखवे खरी
संतुष्ट होईल अंतराय

डोकी उगा भडकवणे
काहींचे प्रियव्यवसाय
गुंतवू भावना जाळ्या
सहजी पळवती साय

व्याधी ग्रासेल मनुजा
हट्टनडणारं अनाठाय
मिथ्या ठरेल भूतदया
घालवू बसा आयुर्दाय

तौलनिक निर्णय हवा
जाणून न्याय अन्याय
निसटूनि जाता समय
नंतर बनाल असहाय

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# पंचवीस वर्षांच्या साडीचा नातीच्या अंगावर नवा जन्म

काही वस्तूंची किंमत त्यांच्या बाजारमूल्यात नसते. त्यांची खरी किंमत त्यांच्यासोबत जोडलेल्या आठवणींमध्ये, नात्यांमध्ये आणि त्या वस्तूंनी आपल्या आयुष्यात सोबत केलेल्या प्रवासात असते. आमच्या घरातली रोहिणीची पंचवीस वर्षे जुनी रेशमी साडी अशीच एक वस्तू आहे. तिच्याकडे पाहिल्यावर आम्हाला केवळ एक जुनी साडी दिसत नाही; त्या साडीबरोबर जगलेले अनेक प्रसंग आणि आठवणी दिसतात.

काळ पुढे गेला आणि ती साडी हळूहळू कपाटात राहू लागली. वापर कमी झाला, पण तिच्याशी जोडलेली भावना तशीच राहिली. एक दिवस आम्ही विचार केलाही साडी आता फक्त आठवण म्हणून कपाटात ठेवायची का? की तिच्या आयुष्याला आणखी एक सुंदर वळण देता येईल? त्यातूनच ती पुन्हा वापरण्याचा विचार पुढे आला.

आज त्याच साडीचा एक सुंदर पोशाख आमची नात अहिल्या घालून आमच्यासमोर उभी होती. काही क्षण आम्ही फक्त तिच्याकडे पाहत राहिलो. रोहिणीने पंचवीस वर्षांपूर्वी जपलेले वस्त्र आता अहिल्याच्या बालपणाचा भाग झाले होते. साडी तीच होती, पण तिचा अर्थ बदलला होता. आजीच्या आठवणींना नातीचे रूप मिळाले होते.

या पोशाखाची आणखी एक गोष्ट आमच्यासाठी महत्त्वाची आहे. तो एका स्वयंसहायता गटातील (SHG) महिलेने शिवला आहे. त्यामुळे आमच्या घरातील एका जुन्या वस्तूला नवे रूप देताना तिच्या कौशल्यालाही काम मिळाले. आम्हाला ही गोष्ट विशेष समाधान देऊन गेली. एका छोट्याशा कौटुंबिक निर्णयातून एका जुन्या वस्तूचा प्रवास पुढे गेला आणि त्यात आणखी एका महिलेच्या श्रमांचा सुंदर सहभाग जोडला गेला.

त्या क्षणी आम्ही पर्यावरण, पुनर्वापर किंवा शाश्वतता यांसारख्या मोठ्या संकल्पनांचा विचार करत नव्हतो. आमच्यासमोर फक्त अहिल्या होती, तिचा पोशाख होता आणि त्या पोशाखामागची रोहिणीची जुनी साडी होती. मात्र




नंतर शांतपणे विचार केला तेव्हा जाणवले की, आपल्या आयुष्यातील अनेक वस्तूंमध्ये अजूनही काहीतरी शिल्लक असतेकधी उपयोग, कधी कौशल्य, कधी आठवण आणि कधी एखाद्या नव्या नात्याशी जोडले जाण्याची शक्यता.

Thread 2 Trend आमच्यासाठी याच अनुभवातून अधिक जवळचा झाला आहे. हा आमच्यासाठी केवळ एखादा उपक्रम किंवा संकल्पना नाही. आमच्या स्वतःच्या आयुष्यात आम्हाला पटलेला विचार प्रत्यक्ष जगून पाहण्याचा तो एक प्रयत्न आहे. आमच्याकडे असलेल्या वस्तूंचा उपयोग पुन्हा करता येतो का, त्यांना नवे रूप देता येते का, त्यांच्या मागची आठवण जपता येते का हे आम्ही स्वतःच्या घरापासून अनुभवत आहोत.

या सगळ्याचा पर्यावरणाशी संबंध आहे, हे नंतर अधिक स्पष्टपणे जाणवते. एखादी वस्तू लगेच बाजूला न करता तिच्याकडे नव्याने पाहिले, तर कदाचित तिचे आयुष्य वाढवता येते. त्यातून नवीन वस्तू तयार करण्याची गरज काही प्रमाणात टाळता येते. एखाद्या कारागिराला किंवा डक्क्ष्महिलेला काम मिळू शकते. आणि कधी कधी त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, एखादी जुनी आठवण पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकते. आमच्यासाठी या अनुभवाचा सर्वांत सुंदर भाग मात्र अहिल्याच्या अंगावर तो पोशाख पाहणे हा आहे. रोहिणीच्या आयुष्यातील पंचवीस वर्षांचा एक छोटासा भाग आज तिच्या नातीच्या आयुष्यात आला आहे. एका पिढीने जपलेली गोष्ट दुसऱ्या पिढीने आपल्या पद्धतीने स्वीकारली आहे. त्यात कोणताही मोठा सोहळा नाही, कोणतीही घोषणा नाहीफक्त घरात घडलेला एक साधा, पण आमच्यासाठी अत्यंत भावनिक क्षण आहे.

शब्दांत सांगताही येणार नाही असा अथांग आनंद! आम्हाला या अनुभवातून इतरांना काही शिकवायचे नाही. आमच्या घरात घडलेली ही एक छोटीशी गोष्ट आम्हाला मनापासून वाटली म्हणून ती शेअर करावीशी वाटली. प्रत्येकाला यातून वेगवेगळे काही दिसू शकते. कुणाला आजी-नातीचे नाते जाणवेल, कुणाला जुन्या वस्तूची आठवण होईल, कुणाला SHG महिलेच्या कौशल्याचे महत्त्व जाणवेल, तर कुणाला आपल्या घरातल्या एखाद्या वस्तूला पुन्हा वापरण्याची कल्पना सुचेल. कदाचित कुणाला यापेक्षा पूर्णपणे वेगळीच भावना जाणवेल. आम्हाला तेही तितकेच सुंदर वाटते.

कारण आम्ही जे मानतो, ते आधी आमच्या आयुष्यात जगून पाहण्याचा आमचा प्रयत्न असतो. 'Thread 2 Trend' हा आमच्यासाठी केवळ एक उपक्रम नाहीतर तो आमच्या कुटुंबाचा श्वास आहे. एखाद्या गोष्टीबद्दल बोलण्यापूर्वी ती आपल्या आयुष्यात अनुभवण्याचा आणि शक्य असेल तिथे कृतीत आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. आज अहिल्याच्या अंगावर रोहिणीची पंचवीस वर्षांची साडी नव्या रूपात पाहताना आम्हाला एवढेच जाणवलेकाही वस्तू जुन्या होत नाहीत; त्या फक्त नव्या आठवणींसाठी आपली वाट पाहत असतात.

आणि कदाचित त्या क्षणीच आम्हाला या संपूर्ण अनुभवाचा सर्वांत सुंदर अर्थ सापडलाआठवणी जपता येतात, वस्तूंना नवे आयुष्य देता येते आणि प्रेम पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवता येते. प्रत्येकाची पद्धत वेगळी असू शकते.

**मन:पूर्वक आणि आदराने,**

**- विजयकुमार कट्टी आणि कुटुंब**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

# पावसाची दांडी, शेती संकटात - प्रशासनाकडे मदतीची हाक



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.३०, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसाने दांडी मारल्याने शेतीपिकांवर मोठे संकट ओढावले आहे. खरीप हंगामातील भात, नाचणी, वरई यांसारखी पिके पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर आहेत. पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली होती, मात्र वेळेवर पाऊस न पडल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. काही ठिकाणी तर शेतजमिनीतील माती पूर्णपणे कोरडी पडली असून, रोपे सुकू लागली आहेत. विहिरी व तलावांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने सिंचनाचीही अडचण निर्माण झाली आहे. स्थानिक शेतकरी सांगतात की, जर पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही, तर संपूर्ण हंगाम वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पाहणी करून पंचनामा करावा व नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे, अन्यथा शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या :-**

तात्काळ पिकांचे पंचनामे करावेत.
नुकसानभरपाई जाहीर करावी.
पीक विमा योजनेंतर्गत मदत द्यावी.
सिंचनासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

# राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियान अंतर्गत विमुक्त भटक्या जमाती हक्क प्रमाणपत्र अभियान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** राज्यातील विमुक्त व भटक्या जमातीच्या नागरिकांना शासनाच्या विविध योजना, सुविधा तसेच आवश्यक प्रमाणपत्रांचा लाभ मिळवून देण्यासाठी राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियानांतर्गत विमुक्त-भटक्या जमाती हक्क व प्रमाणपत्र अभियान दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी मौजा गंगापूर (नवीन) व २९ सप्टेंबर २०२६ रोजी मौजा चेक गंगापूर येथे आयोजित करण्यात आले.

तहसील कार्यालय पोंभुर्णा यांच्या वतीने आयोजित या अभियानात विमुक्त-भटक्या जमातीच्या नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच आवश्यक प्रमाणपत्रे व शासकीय सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अभियानामध्ये जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच आधार कार्ड, रेशन कार्ड, पोस्ट बँक, वैद्यकीय तपासणी व आरोग्य सेवा आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

अभियाना दरम्यान नागरिकांच्या विविध अडचणी व प्रश्न जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले. त्यामुळे विमुक्त-भटक्या जमातीतील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया, कागदपत्रे आणि प्रमाणपत्रांबाबत माहिती मिळाली. यावेळी तहसीलदार मोहनीश शेळवटकर साहेब तसेच तहसील कार्यालय पोंभुर्णा येथील अधिकारी, कर्मचारी, संबंधित विभागांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विमुक्त-भटक्या जमाती समाजाच्या हक्कांसाठी एक पाऊल पुढे या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या अभियानाला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# बल्लारपूर, जिवती, ब्रह्मपुरीच्या शेतकऱ्यांसाठी आ.मुनगंटीवारांचा संवेदनशील पाठपुरावा



## प्रत्यक्ष पाहणी करून दुष्काळग्रस्तांना मदतीचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात केवळ त्यांच्या पाठीशी उभे राहणे नव्हे, तर त्यांच्या प्रश्नांचा शासनस्तरावर आग्रही पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची आ.सुधीर मुनगंटीवार यांची संवेदनशील भूमिका आज पुन्हा अधोरेखित झाली. बल्लारपूर, जिवती आणि ब्रह्मपुरी हे तीन तालुके दुष्काळग्रस्त यादीतून वगळल्याने या तालुक्यांतील शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आ. मुनगंटीवार यांनी मुंबई येथील वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन मागणी केली. त्याची तातडीने दखल घेत प्रत्यक्ष पाहणी करून दुष्काळग्रस्तांना मदतीचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन विभागाला दिले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये पावसाचे अनिश्चित व असमान प्रमाण, पिकांची चिंताजनक अवस्था, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांवर वाढत असलेला आर्थिक ताण लक्षात घेऊन आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने शासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्ह्यातील १२ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाल्यानंतर बल्लारपूर, जिवती आणि ब्रह्मपुरी या ३ तालुक्यांतील शेतकऱ्यांनाही समान न्याय मिळावा, यासाठी त्यांनी हा विषय थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात तीनही तालुक्यांतील पर्जन्यमान, पिकांची सद्यस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि प्रत्यक्ष दुष्काळी परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची मागणी केली. केवळ पूर्वनिश्चित निकष किंवा उपलब्ध आकडेवारीवर निर्णय न घेता प्रत्यक्ष परिस्थितीची पडताळणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, अशी आ.मुनगंटीवार यांनी भूमिका मांडली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनीही या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद देत ग्राऊंड ट्रुथिंगच्या माध्यमातून प्रत्यक्ष परिस्थिती तपासणे, नव्या पीक पाहणी पद्धतीतून पिकांची स्थिती जाणून घेणे आणि आवश्यक ते पंचनामे करून वस्तुस्थिती निश्चित करणे, यावर भर दिला. त्यानुसार दुष्काळाची प्रत्यक्ष झळ पोहोचलेल्या शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवले जाऊ नये, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश अतिरिक्त मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन विभागाला देण्यात आले आहेत. यामुळे बल्लारपूर, जिवती आणि ब्रह्मपुरी या तीन तालुक्यांच्या दुष्काळग्रस्त यादीतील समावेशाचा मार्ग प्रत्यक्ष परिस्थितीच्या नव्याने होणाऱ्या पडताळणीसाठी खुला झाला आहे. दुष्काळाची तीव्रता आणि पिकांचे नुकसान प्रत्यक्ष पाहणी व पंचनाम्यांतून स्पष्ट झाल्यानंतर त्याआधारे पुढील आवश्यक निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना वीज बिलात सवलत, वीजजोडणी खंडित न करणे, विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सवलत, पाणीपुरवठा तसेच पीक नुकसानीनुसार मदत व नुकसानभरपाई यांसह शासनाच्या विविध सवलतींचा लाभ मिळणार आहे. प्रत्यक्ष पाहणी व पंचनाम्यांच्या आधारे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वेळीच दिलासा मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक पावले उचलली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. बळीराजाच्या संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे, त्याचा आवाज शासनाच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचवणे आणि प्रत्यक्ष नुकसानीच्या आधारे त्याला न्याय मिळवून देणे, या भूमिकेतून आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या या पाठपुराव्यामुळे बल्लारपूर, जिवती आणि ब्रह्मपुरीतील शेतकऱ्यांच्या आशेला आता नवी दिशा मिळाली आहे.

# आदिवासींच्या मूलभूत हक्कांसाठी पनवेल महापालिकेसमोर आमरण उपोषण



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३०, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील वाघऱ्याची वाडी-टेंभोडे तसेच सागवाडी-वळवली येथील आदिवासी वस्त्यांमध्ये मूलभूत नागरी सुविधांचा गंभीर अभाव असल्याचा आरोप करत जनहक्क अधिकार संघर्ष सामाजिक संस्थेच्या नेतृत्वाखाली आदिवासी बांधवांनी पनवेल महानगरपालिका मुख्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, पथदिवे, स्वच्छता, आरोग्य आणि इतर आवश्यक सुविधांच्या मागण्यांसाठी हे आंदोलन छेडण्यात आले असून, प्रशासनाने ठोस आणि कालबद्ध कार्यवाही केल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, देशाला स्वातंत्र्य मिळून आठ दशकांहून अधिक काळ लोटला असून भारताने विकासाच्या विविध क्षेत्रांत मोठी झेप घेतली आहे. मात्र पनवेल महानगरपालिका हद्दीतील अनेक आदिवासी वस्त्यांमध्ये आजही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि दैनंदिन प्रवासासाठी संघर्ष करावा लागत आहे. अनेक ठिकाणी वाडीपर्यंत जाण्यासाठी पक्के रस्ते नसल्याने रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने किंवा इतर अत्यावश्यक सेवा वेळेवर पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

पनवेल महानगरपालिका स्थापन होऊन जवळपास १० वर्षे उलटून गेली असतानाही आदिवासी वस्त्यांमधील मूलभूत समस्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. आदिवासी समाज हा जल, जंगल आणि जमिनीचा मूळ संरक्षक असूनही त्यांना आजही मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. उपोषणकर्त्यांनी प्रशासनाकडे सात प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये वाघऱ्याची वाडी, टेंभोडे, सागवाडी आणि वळवली येथील वस्त्यांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून सर्वंकष अहवाल तयार करणे, प्रत्येक कुटुंबाला शुद्ध आणि नियमित पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी पुरवठा करणे, रस्ते व अंतर्गत रस्त्यांची व्यवस्था करून अत्यावश्यक सेवा पोहोचण्याची हमी देणे, संविधानातील अनुच्छेद १४, २१ आणि ४६ नुसार आदिवासींच्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करणे, वीज व पथदिव्यांसह इतर नागरी सुविधांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करणे, नियमित स्वच्छता कर्मचारी नियुक्त करणे आणि आवश्यक असल्यास संबंधित वस्त्यांना महानगरपालिका हद्दीत समाविष्ट ठेवण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करणे यांचा समावेश आहे. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, आदिवासी बांधवांना मूलभूत नागरी सुविधा मिळणे हा कोणताही उपकार नसून तो त्यांचा संविधानिक आणि मानवी हक्क आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामांना सुरुवात करून त्याबाबतची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या आमरण उपोषणामुळे पनवेल परिसरातील आदिवासी वस्त्यांमधील मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, प्रशासन या आंदोलनाची कितपत दखल घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आंदोलनस्थळी विविध सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपोषणकर्त्यांना पाठिंबा देत आहेत.

**मे.श्री. एम.आर.जाधव न्यायालय, जिल्हा न्यायाधीश -२५ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे**

**आरोपीस पेपर जाहीर नोटीस**
(u/s-356 of BNNS act.)

सेशन केस नं. ३७४ / २०१७
लोणीकंद पो.स्टे. गु.र.नं. ५/२०१४
भादंवि कलम - ३२८,१७९,१८८,२७३
अन्न सुरक्षा व मानदे कायदा - २६/२/४,५८,५९

महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन)
विरुध्द
नरेंद्रकुमार रमेशचंद श्रीचोडुराम - आरोपी
रा.गल्ली नं.५, साई सत्यम पार्क, पुणे-नगर हायवे, वाघोली, ता. हवेली, जि.पुणे
मुळ रा. अे/६०, संजय कॉलनी, पाटियाला, जालिंदर रोड, पाटियाला, ता.जि. पाटियाला, राज्य पंजाब

ज्या अर्थी महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन) तर्फे यांनी या न्यायालयाकडे सेशन केस नं.३७४/२०१७ दाखल केलेले आहे. सदरील प्रकरणामध्ये आरोपी हा अनेक दिवसांपासुन गैरहजर असल्यामुळे सदर प्रलंबित आहे. तरी सदरील आरोपी विरुध्द पेपर जाहीर नोटीस प्रसिध्द होताच तात्काळ न्यायालयात हजर होण्याबाबत ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील प्रकरणांची पुढील तारीख १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त प्रकरणांचा एकतर्फा सुनावणी होउन निर्णय दिला जाईल. दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन,

शिक्का

**अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय, पुणे

**मे.श्री. एम.आर.जाधव न्यायालय, जिल्हा न्यायाधीश -२५ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पुणे**

**आरोपीस पेपर जाहीर नोटीस**
(u/s-356 of BNNS act.)

सेशन केस नं. २५२/२०१७
लोणीकंद पो.स्टे. गु.र.नं. २८३/२०१४
भादंवि कलम - ३२८,
मुं.प्रोव्ही. कायदा - ६५,ख,ड

महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन)
विरुध्द
अंदु उर्फ मंजु राजु रजपुत - आरोपी
रा. पेरणे फाटा झोपडपट्टी, ता. हवेली, जि.पुणे

ज्या अर्थी महाराष्ट्र सरकार (लोणीकंद पोलिस स्टेशन) तर्फे यांनी या न्यायालयाकडे सेशन केस नं.२५२/२०१७ हे दाखल केलेले आहे. सदरील प्रकरणामध्ये आरोपी हा अनेक दिवसांपासुन गैरहजर असल्यामुळे सदर प्रलंबित आहे. तरी सदरील आरोपी विरुध्द पेपर जाहीर नोटीस प्रसिध्द होताच तात्काळ न्यायालयात हजर होण्याबाबत ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील प्रकरणांची पुढील तारीख १२/२०/२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त प्रकरणांचा एकतर्फ सुनावणी होउन निर्णय दिला जाईल. दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन,

शिक्का

**अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय, पुणे

# कळमसरे विद्यालयात मासिक पाळी व्यवस्थापनावर कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३०, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील आदर्श माध्यमिक विद्यालय कळमसरे येथे विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीविषयी योग्य माहिती, स्वच्छतेच्या सवयी आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने मासिक पाळी स्वच्छता व व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका आदरणीय वैशाली सोनवणे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.जे.सोनवणे, सखीसावित्री समितीच्या सदस्या व पालक प्रतिनिधी निता माळी व भारतीताई गोसावी व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या उपक्रमांतर्गत विज्ञान शिक्षिका नेहा चौधरी यांनी विद्यार्थिनींना मासिक पाळी ही शरीरातील एक नैसर्गिक प्रक्रिया असून त्याबाबत संकोच न बाळगता योग्य माहिती व स्वच्छतेची काळजी घेणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन केले. मासिक पाळीच्या काळात वैयक्तिक स्वच्छता, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर, वेळोवेळी पॅड बदलणे, वापरलेल्या पॅडची योग्य विल्हेवाट लावणे, हातांची स्वच्छता व पुरेसे पाणी पिण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच हर्षदा चौधरी यांनी मासिक पाळी सबंधित विविध रोग व त्यासाठी घ्यावी लागणारी काळजी याबाबत सखोल माहिती दिली .प्रमुख अतिथी निता माळी यांनी आपल्या मनोगतात उपक्रमाचे खुप कौतुक केले व असे सत्र नेहमी आयोजित करावे अशी विनंती केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा वैशाली सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मासिक पाळीशी संबंधित गैरसमज दूर करून विद्यार्थिनींनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहावे आणि कोणतीही आरोग्यविषयक अडचण जाणवल्यास पालक किंवा शिक्षकांशी मोकळेपणाने संवाद साधावा, असे आवाहन केले.

या उपक्रमास सहकारी शिक्षिक शिक्षिका यांनी सहकार्य केले. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सांस्कृतीक प्रमुख आदरणीय श्रीमती ज्योती निकवाडे यांनी केले.

# मकोकातील फरार कुख्यात संघर्ष बागडे प्रोडक्शन वॉरंटवर पोलिसांच्या जाळ्यात

## ५ दिवसांची कोठडी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** खापरखेडा मुख्य बाजारपेठेत घडलेल्या बहुचर्चित दगडी चाळ गँगवार प्रकरणातील फरार असलेला मकोकाचा कुख्यात आरोपी संघर्ष बागडे (१९) इंदिरानगर झोपडपट्टी, खापरखेडा याला अखेर खापरखेडा पोलिसांनी मम ोका न्यायालयातून प्रोडक्शन वॉरंटवर २९ सप्टेंबर मंगळवारला ताब्यात घेतले आहे. कुख्यात आरोपी संघर्ष बागडे याला मकोका न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला ३ ऑक्टोबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने दहशत माजवत रक्तरंजित गँगवार घडवून आणले होते. या घटनेनंतर पोलिसांनी टोळीचा मुख्य म्होरक्या सूरज कावळे, संघर्ष बागडे, शुभम उर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बुट्या बागडे यांच्यासह १३ जणांविरुद्ध विविध कलमांसह म हाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई केली होती. या प्रकरणातील ९ आरोपी सध्या म ध्यवर्ती कारागृहात असून अल्पवयीन आरोपी बालसुधारगृहात आहेत. मात्र, मुख्य सूत्रधार सूरज कावळे, शुभम यर्फ शेरू उईके, साहिल उर्फ बूट्या बागडे, संघर्ष बागडे व त्याचे साथीदार घटनेनंतर फरार झाले होते.

गँगवारनंतर खापरखेडा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार झालेला कुख्यात आरोपी संघर्ष बागडे फरारी काळात घरफोडी गुन्ह्यात सक्रिय होता. हुडकेश्वर व एमआयडीसी हिंगणा व वर्धा जिल्ह्यात घरफोड्यांचे सत्र सुरू होते.

अखेर २२ सप्टेंबरच्या रात्री हुडकेश्वर पोलिसांच्या डीबी पथकाने अमरावती जिल्ह्यातील धानोरा येथे धाड टाकून संघर्ष बागडे व त्याचा साथीदार ऋषिकेश मानकर या दोघांना बेड्या ठोकल्या होत्या.

जिल्ह्यात गणेश विसर्जन बंदोबस्ताचा मोठा ताण असल्याने आरोपीला तत्काळ ताब्यात घेणे खापरखेडा पोलीसांना शक्य झाले नव्हते. विसर्जन बंदोबस्त आटोपताच मकोका प्रकरणाचे तपास अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर यांनी न्यायालयात अर्ज करून प्रोडक्शन वॉरंट मिळवला २९ सप्टेंबर रोजी खापरखेडा पोलिसांनी संघर्ष बागडेला ताब्यात घेऊन मकोका न्यायालयात हजर केले.

न्यायालयाने ३ ऑक्टोबर पर्यंत ५ दिवस पोलीस कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

संघर्ष बागडे पोलीस कोठडी मिळाल्यामूळे दगडी चाळ गँगवार प्रकरणातील मुख्य सूत्रधार सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके आणि साहिल उर्फ बुट्या बागडे या अद्याप फरार असलेल्या आरोपींचे ठावठिकाणे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर व खापरखेडा पोलीस या दिशेने कसन चौकशी करत असून घटनेतील प्रमुख आरोपी लवकरच जेरबंद होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# वाढदिवस साजरा न करता मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १ लाख ११ हजारांची मदत

## भाजप नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांचा सामाजिक आदर्श

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत भाजप नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला.

तसेच कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांनी वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी किंवा अनावश्यक खर्च न करता सामाजिक कार्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले होते. दुष्काळग्रस्त नागरिकांना मदत मिळावी आणि या संकटाच्या काळात राज्यातील कष्टकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहता यावे, या उद्देशाने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ लाख ११ हजार रुपयांचा धनादेश भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेला हा उपक्रम केवळ आर्थिक मदत नसून, दुष्काळग्रस्त नागरिकांच्या दुःखात सहभागी होत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा एक छोटासा सामाजिक प्रयत्न असल्याचे वेदिका साहिल पाटील यांनी सांगितले. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून तो



निधी सामाजिक कार्यासाठी देण्याच्या निर्णयाबद्दल उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस आमदार माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस आमदार संजय कुटे,भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब, ठाणे महानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपमहापौर राहुल दामले, ठाणे महानगरपालिकेचे गटनेते मुकेश मोकाशी, कल्याण-डोंबिवली म हानगरपालिकेचे गटनेते शशिकांत कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# रास गरबा रद्द - मदतीचा गरबा सुरू

## शैलेश पाटील यांचा गरीब - गरजूंसाठी लाखोंचा मदतनिधी जाहीर



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त हजारो नागरिकांच्या उपस्थितीत साजरा होणारा सर्वात मोठा 'रास गरबा २०२६' यंदा रद्द करण्याचा मोठा आणि संवेदनशील निर्णय घेण्यात आला आहे. शिवसेना उपशहर प्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी हा निर्णय जाहीर केला आहे.

दिवा विकास प्रतिष्ठान, श्रीकृष्ण नगर दिवा (पूर्व) आणि खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य रास गरबा आयोजित केला जातो. या कार्यक्रमासाठी दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च केला जातो. मात्र यंदा राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि दिव्यातील गरीब कुटुंबांची बिकट अवस्था लक्षात घेता, हा संपूर्ण खर्च सामाजिक कार्यासाठी वळवण्याचा निर्णय शैलेश पाटील यांनी घेतला आहे.

**या मदत निधीतून काय होणार?**

१. दिव्यातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय फी भरण्यासाठी आर्थिक मदत.

२. पैशाअभावी उपचारापासून वंचित असलेल्या गरजू रुग्णांना औषधोपचार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयाचे बिल भरण्यासाठी मदत.

३. हाताला काम नसलेल्या व काम करण्यास असमर्थ असलेल्या गरजू व्यक्तींना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न.

याबाबत बोलताना नगरसेवक शैलेश पाटील म्हणाले, पूर असो, दुष्काळ असो किंवा कोरोनासारखे संकट असो, कार्यसम्राट खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब नेहमीच जनतेच्या मदतीसाठी धावून येतात. त्यांचाच आदर्श घेऊन आम्ही हा निर्णय घेतला आहे. उत्सव पुन्हा होतील, पण संकटाच्या काळात माणसाच्या सोबत उभे राहणे, हीच खरी सेवा आहे. माझ्या दिव्यातील एकाही गरीब कुटुंबावर अन्याय होणार नाही यासाठी हा 'मदतीचा गरबा' आम्ही सुरू केला आहे.

शैलेश पाटील यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे दिवा शहरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, एका लोकप्रतिनिधीने प्रसिद्धी आणि उत्सवापेक्षा माणुसकीला महत्त्व दिल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# कलासाधना सामाजिक संस्थेचा राष्ट्रस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, नवी मुंबई :** कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला राष्ट्रस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कामोठे येथे मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील आणि सरस्वती पूजन तसेच दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीराम महाजन यांनी केले. सूत्रसंचालन अनघा जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर देवकर यांनी केले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा मेघा म हाजनयांनी पुरस्काराचे महत्त्व अधोरेखित करताना, पुरस्कारामुळे व्यक्तीला



प्रेरणा मिळते आणि प्रेरणेतूनच राष्ट्र घडते,असे प्रतिपादन केले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील (कोकण शिक्षक मतदार संघ)यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रत्नाकर अहिरे (माजी प्राचार्य व उप-आयुक्त), विश्वविख्यात जादूगार सतीश देशमुख आणि ज्येष्ठ सिने अभिनेत्री आशा ज्ञाते उपस्थित होत्या. उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विविध पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

**पुरस्कार विजेते पुढीलप्रमाणे :-**

भारत गौरव श्री पुरस्कार

सुनील ठाकूर, राजन देसाई, डॉ. प्रकाश अंभोरे, गजेंद्र शेळके, जयकुमार चर्जन, अनिल डोंगरे, सुदत्ता साळवे, विनोद भंगाळे, सुभाष चव्हाण, प्रतिभा घोडके, सुमन देसाई, सचिन डाकी, मंगला डाकी, हेमलता गिते, कमलेश परदेशी, पूनम पोटे, मिलिंद लांडे, कल्पना शेलार, तानाजी जाधव.

डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार

चंदन तोडणकर, जितेंद्र शिंदे, दिगंबर वारे, राजेंद्र चौधरी, एकनाथ पांचाळ बितनाळकर, गीता आहिर, जितेंद्र जोशी, संजय पाटील, दिनेश रिकामे, सुमतीगिरी गोसावी, सुरेखा सावंत, शशिकला पवार, रमेश उईके, बाबाजी वाघमारे, अतुल अस्वार, सुनील म्हात्रे, जानवी प्रभू, निळकंठ व्यापारी, प्रशांत माळी, पंडित फंगाळ, प्रकाश भामरे, राकेश महाजन.

राजा रवि वर्मा कला तपस्वी पुरस्कार

उल्हास देशमुख, ज्ञानेश्वर सोनवणे, सुरेश वाघमारे, अशोक बाबर, मनोहर उगले.

**राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धा :**

प्रथम पारितोषिक – क्रिष्णा जाधव

द्वितीय पारितोषिक – सिराज तडवी

तृतीय पारितोषिक – सिद्धेशोर कामसे

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक जाधवर, समाधान रोकडे आणि जितेंद्र अहिरराव यांनी विशेष परिश्रम घेतले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान तसेच राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव यामुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

## थोडक्यात बातम्या

# ब्रम्हपुरी, बल्लारपूर व जिवती तालुक्यांना दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

## खा.धानोरकर यांची मुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती, बल्लारपूर व ब्रम्हपुरी हे तीन तालुके दुष्काळग्रस्त यादीतून वगळण्यात आल्यामुळे येथील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होत आहे. या कालुक्यांमध्ये तात्काळ प्रत्यक्ष पंचनामे करुन त्यांना दुष्काळग्रस्त घोषित करावे, अशी लोकहितकारी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मुख्यमंत्री व कृषीमंत्र्यांना दिलेल्या पत्रात खा. प्रतिभा धानोरकर यांनी नमूद केले की, चंद्रूर जिल्हा हा प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीतून जिवती, बल्लारपूर व ब्रम्हपुरी हे तीन तालुके वगळण्यात आले आहे. यासाठी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाल्याचे तांत्रिक कारण दिले जात आहे. वास्तविक पाहता, यावर्षी सर्वत्र समान पाऊस झालेला नाही. अवघ्या ५०० मीटरच्या अंतरावर एका भागात पाऊस पडत असताना लगतच्या दुसऱ्या भागात पाऊस गायब असल्याचे चित्र पाहायला मिळाले. केवळ पर्जन्यमापन यंत्रणेच्या मर्यादित तांत्रिक नोंदीवरुन संपूर्ण तालुक्याची परिस्थिती ठरविणे हे शेतकरीहिताच्या दृष्टीने अत्यंत अन्यायकारक आहे. पर्जन्यमापन केंद्राच्या या तांत्रिक आकडेवारीमुळे स्थानिक शेतकरी मदतीपासून वंचित राहत असून, अनेक भागात पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे गंभीर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर केवळ पर्जन्यमान केंद्राच्या आकडेवारीवर न थांबता जिवती, बल्लारपूर व ब्रम्हपुरी या तिन्ही तालुक्यातील सर्व बाधित भागात तात्काळ प्रत्यक्ष पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला द्यावेत आणि या तिन्ही तालुक्यांना तातडीने दुष्काळग्रस्त घोषित करुन शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत व दिलासा द्यावा, अशी मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी पत्राद्वारे केली आहे.

# नगरसेविका अर्चना पाटील यांनी रास गरबा रद्द करून १० महिन्यांचे मानधन दिले शेतकऱ्यांना




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. २९, दिवा (ठाणे) :** राज्यात शेतकऱ्यांवर आलेल्या दुष्काळी संकटाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत प्रभाग क्रमांक २९-अ च्या नगरसेविका तथा राजे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अर्चना निलेश पाटील यांनी एक आदर्शवत निर्णय घेतला आहे.

शेतकऱ्यांच्या या दुःखात सहभागी होत, कार्यसम्राट खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या निर्णयाचा आदर्श घेऊन मंडळाच्या वतीने आम्ही यंदाचा रास गरबा उत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने होणारा संपूर्ण खर्च आम्ही शेतकऱ्यांना म दत म्हणून देणार आहोत, असे अर्चना पाटील यांनी जाहीर केले. तसेच मी नगरसेविका म्हणून निवडून आल्यापासून आतापर्यंतचे १० महिन्यांचे मानधन १ लाख ५० हजार रुपये इतकी रक्कम डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन मध्ये जमा करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, पूर असो, दुष्काळ असो किंवा कोरोनासारखे संकट... प्रत्येक वेळी राजे प्रतिष्ठान मंडळ जनतेच्या सेवेत खंबीरपणे उभे राहिले आहे आणि पुढेही राहील. उत्सव पुन्हा होतील... पण संकटाच्या काळात माणसाच्या सोबत उभे राहणे, हीच खरी सेवा! अर्चना पाटील यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# सेवा संकल्प-राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियानांतर्गत उल्हासनगरमध्ये विशेष शिबीर संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.३०, ठाणे :** महाराष्ट्र शासनाच्या 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियाना' अंतर्गत उल्हासनगर तहसीलदार कार्यालयाच्या वतीने 'भटके विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियाना'चे विशेष आयोजन करण्यात आले. विठ्ठलवाडी, उल्हासनगर-३ येथील गोपाळ समाज मंदिर, शांतीनगर येथे पार पडलेल्या या शिबिराला परिसरातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या म ाध्यमातून एकूण ५१४ लाभार्थ्यांना विविध शासकीय दाखले व आरोग्यविषयक सुविधांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला. हे विशेष शिबीर ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, उपविभागीय अधिकारी अमित सानप आणि तहसिलदार कल्याणी कदम-मोहिते यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक महसूल अधिकारी व विविध विभागांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पडला. शिबिरादरम्यान नागरिकांना एकाच ठिकाणी अनेक महत्त्वपूर्ण शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये १२९ नागरिकांना जातीचे दाखले, २२ नागरिकांना अधिवास दाखले, १२ नागरिकांना रहिवास दाखले, ६ नागरिकांना उत्पन्नाचे दाखले, ८ नागरिकांना ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र आणि ३ नागरिकांना वयाचे दाखले वितरित करण्यात आले. तसेच महसूल विभागाशी संबंधित नमुना ६, ७, ८ ची ४० कामे पूर्ण करण्यात आली. सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधांच्या अंतर्गत ७० नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड आणि ८० नागरिकांना आभा कार्ड देण्यात आले, तर १५ नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. याशिवाय शिधावाटप कार्यालयामार्फत २३ नागरिकांना, संगांयो (संजय गांधी निराधार योजना) विभागामार्फत ४ नागरिकांना सेवा पुरवण्यात आल्या, तसेच १६ नागरिकांची आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती पूर्ण झाली. तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग, ठाणे यांच्या वतीने तब्बल ८६ नागरिकांना विविध शासकीय कल्याणकारी योजना, शिष्यवृत्ती आणि स्वयंरोजगार विषयांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महसूल, सेतू केंद्र, आरोग्य आणि पुरवठा विभागांच्या प्रभावी समन्वयामुळे या विशेष शिबिरातून भटक्या व विमुक्त जमातीतील नागरिकांना एकाच छताखाली सर्व सुविधा मिळून शिबीर अत्यंत यशस्वी ठरले.